भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.५९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०८/२०१६

**१) महीलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :—**

सन २०१२ ते जुलै २०१७ पावेतो यातील आरोपीने फिर्यादीचे मन परिवर्तन करून गोडगोड बोलुन मी तुझा वाईट होवु देणार नाही, तुला नेहमी मदत करणार अशा प्रकारचा आमीष दाखवुन वेळोवेळी जबरी संभोग केला, तसेच आरोपी क्र. ०२ ने आरोपी क्र.०१ ला मदत केली व आरोपी क्र.०१ ने फिर्यादीस ही गोष्ट कोणाला सांगीतले तर तुला व तुझ्या परिवाराला जिवानाशी मारीन अशी धमकी दिली, त्यामुळे फिर्यादीने भितीपोटी पोलीस स्टेशन ला उसीरा तक्रार दिली अशा प्रकारच्या फिर्यादीने दिलेल्या लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे ३७६,(२)(एन) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे

**२) सोन्या चांदीच्या दागीन्याची चोरी :—**

दिनांक २२/०८/२०१७ चे २२.३० ते २३/०८/२०१७ चे ०५.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुनिही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराच्या मागील दरवाज्याचा कळीकोंडा तोडुन घरात प्रवेश करून माजघरातील लोखंडी गोदरेजच्या आलमारीत ठेवलेल्या सुटकेसमधील २ जुन्या वापरत्या सोन्याची नथ वजन १० ग्रॅम कि. ७,०००/रु, १ जुनी वापरती सोन्याची एकदानी वजन ०५ ग्रॅम, कि.३,५००/रु असा एकुन १०,५००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शिवलाल केशवराव शेंडे वय ५३ वर्ष, रा. लोहार याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.इंगळे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) काळी पीवळी वाहनाच्या धडकेत तिन जखमी होवुन गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे १७.१० वा. दर यातील फिर्यादी नितीन नरहरी यावलकर वय ४२ वर्ष रा. गांधी वार्ड सौदंड हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३५ ए ५५० ने पत्नी मुलासह सौदंड कडुन साकोली कडे येत असतांना टोल नाका सेंदुर्वाफा येथे यातिल आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन दोन ट्रक मधुन काढुन मोटार सायकल चालकास धडक दिल्याने फिर्यादी व त्याची पत्नी सौ. रिता वय ३४ वर्ष व मुलगा राजा वय ०३ वर्ष यास जखमी करून मोटार सायकलचे ५०००/रु चे नुकसान करून पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नवखरे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) ऑटो निष्काळजीपने चालवुन रेनॉल्ड क्वीट गाडीला धडक मारून पळुन गेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी अभिषेक नत्थुजी वाढीभष्मे वय२१ वर्ष रा. भेंडाळा पो.स्टे. पवनी हा रेनॉल्ड क्वीट गाडी क्र. एमएच ३६ झेड ०७०१ ने तुमसर कडुन जिल्हापरिषद चौकाकडे रोडनी येत असतांना, त्याचे विरूध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी ऑटो चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे गाडीला धडक मारून पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी.गभने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) कन्टेनरच्या धडकेत एक जखमी व एकाच्या मृत्यु:—**

दिनांक २३/०८/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील मृतक आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कन्टेनर भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन आपली साईड सोडुन दुसऱ्या रोडवर जावुन ट्रक क्र. सी.जी ०७ एएक्स ९०१४ ला धडक देवुन स्वत:चे मरणास व ट्रक क्र. सीजी ०७ एएक्स ९०१४ चा चालक फिर्यादी व क्लिनर उपद्रसिंग लालबाबुसिंग वय २८ वर्ष रा. नंदनीरोड पॉवर हाऊस भिलाई यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पेस कारसिंग लालबाबुसिंग वय ४८ वर्ष रा. नंदनीरोड पॉवर हाऊस भिलाई यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवि सहकलम १८४/१७७ मोवका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.पुढिल तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे कारधा हे करित आहेत

**६) मुदत बाहय औषधीचा साठा बाळगुन, व कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे ११.०० ते १७.०० वा. दर. यातील फिर्यादी व त्यांचे वरिष्ठ अधीकारी यांनी यातील आरोपी याचे विश्वनाथ आर्युवेदीक क्लिनीकची तपासनी केली असता, आरोपीचे क्लिनीक मध्ये वर्गपीत औषधी (ॲलोपॅथीक) चा साठा करून ठेवल्याचे मिळुन आल्याने औषधीचे साठयाबाबत कोणत्याही प्रकारचा परवाना न दाखवील्याने , तसेच आरोपीकडे मुदत बाहय औषधीचा साठा मिळुन आल्याने, कार्यवाही होण्याकरीता फिर्यादी प्रशांत राजेद्र रामटेके वय ४० वर्ष रा. साहायंक आयुक्त व औषधप्रशासन कार्यालय भंडारा औषधी निरीक्षक यांचे दिलेल्या लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम १८(सी) औषधी व प्रशासन कायदा १९४० सहकलम २७(डी), १८ (बी), २८ (अ), ३३,३६ महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधीनियम १९६१ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे.साकोली हे करित आहेत

**७) कॅन्सरच्या त्रासाला कंटाळुन इसम पाण्यात बुडुन मृताअवस्थेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे ०५.०० ते ०७.०० वा. दर. यातील मृतक सदगुरू शिवाजी हजारे वय ५५ वर्ष रा. करचखेडा हा कॅन्सरच्या त्रासाला त्रस्त असल्याने झोपेतुन उठुन कोनालाही न सांगता दि. २३/०८/२०१७ ला घरून निघुन गेला होता. करचखेडा ते भिलेवाडा रोडवर मध्यभागी नाल्यामध्ये चप्पल दिसुन आल्याने लोंकानी नाल्याच्या पाण्यात शोध घेतला असता, यातिल मृतक हा नाल्याच्या पाण्यात मृताअवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सुनिल रामप्रसाद हजारे वय ३६ वर्ष, रां. आनंदनगर तकियावार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २३/०८/२०१७ चे ०७.१५ वा. दर. यातील मृतक मधुकर रघुनाथ गोस्वामी वय ६५ वर्ष रा. दवडीपार याचे छातीत व पोटात दुखत असल्याने व शरीरात अशक्तपणा असुन त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास दि. २१/०८/२०१७ ला औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती केले असता, औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने तसेच मरणाचे कारन न पटल्याने फिर्यादी लेहनदास प्रेमदास गोस्वामी वय ५१ वर्ष यांचे रिपोर्ट व डॉ मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,मोहाडी, कारधा, वरठी, व आंधळगाव येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभटटी दारु किंमती ७,०००/—रु. तसेच व जुगारातुन किंमती ६९५/—रु. असा एकुण किमती ७,६९५/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली अवैध प्रवासी ०४ असून तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३केसेस करण्यात आलेल्या आहे.

**पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.